**श्री. अजितकुमार विष्णू देठे,**

विरुध्द...

**फोंडाघाट एज्युकेशन सोसायटी, फोंडाघाट ता. कणकवली जि. सिंधुदूर्ग व इतर**

**निशानी क्र. ३३ खालील आदेश**

(दिनांक २९/१०/२०२५)

प्रस्तुतचा अर्ज अपिलकार यांनी दिवाणी प्रक्रिया संहितेतील आदेश ०६ व नियम १७ कलम १५१ अन्वये अपिलामध्ये दुरुस्ती करण्याकरीता दाखल केला आहे. जाब देणार यांनी निशानी ३४ वर त्यांचे म्हणणे मांडून अर्जास विरोध दर्शविला.

२. अपिलकार यांच्या कथनाप्रमाणे अपिलकार यांनी प्रस्तुतचे अपिल हे सेवासमाप्तीविरूध्द दाखल केले असून व्यवस्थापनाचे नाव जाबदार परिच्छेदात जाबदार क्र. १ व २ म्हणून नमूद केले आहे. प्रत्यक्षात जाबदार क्र. २ म्हणून व्यवस्थापनाचे सचिव यांना पक्षकार करावयाचे होते, परंतू नजरचुकीने सचिवांव्यतिरिक्त व्यवस्थापन यांना पुन्हा पक्षकार करण्यात आले. सबब, अपिलातील जाबदार परिच्छेदातील जाबदार क्र. २ व्यवस्थापनाचे नाव खोडून त्याऐवजी सेक्रेटरी, फोंडाघाट एज्युकेशन सोसायटी, फोंडाघाट ता. कणकवली जि. सिंधुदूर्ग यांचा जाबदार क्र. २ म्हणून समावेश करावा.

३. याउलट जाबदार यांच्या कथनाप्रमाणे दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ०७ नियम ११ अन्वये अर्ज प्रलंबित असताना प्रस्तुतची दुरूस्ती करून अपिलकार पळवाट शोधत आहे. ख-या वादाचे निराकरण करण्याकरीता दुरूस्तीची तरतुद कायद्यात करण्यात आली आहे. परंतू, अपिलकार त्याचे दोष झाकण्याकरीता सदरची दुरूस्ती करण्याच्या प्रयत्नात आहे.

४. उभय विद्यमान विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांच्या लेखी कैफीयतीप्रमाणे युक्तीवाद सादर केला.

५. प्रकरणाचे अवलोकन करता असे निदर्शनास येते की, अपिलामध्ये व्यवस्थापनास दोनवेळा पक्षकार करून मार्फत अध्यक्ष व सेक्रेटरी असे जाबदार क्र. १ व २ म्हणून नमूद केले आहे. कायदेशिर व्यक्तीस त्याच्या प्रतिनिधीमार्फत पक्षकार केले जावू

शकते, असा कायदा आहे. परंतू, कायदेशिर व्यक्तीस दोनवेळा पक्षकार करणे न्यायवह नाही. प्रस्तुत अर्जातील कथन लक्षात घेता प्रकरणातील व्यवस्थापनाचे सेक्रेटरी हे अंमलबजावणी करणारे अधिकारी असलेने त्यांना प्रस्तुत अपिलकामी पक्षकार करणे गरजेचे असलेचे व नजरचुकीने मार्फत सेक्रेटरी म्हणून पक्षकार केलेचे अपिलकार यांचे कथन ग्राहय धरण्याजोगे ठरते. या परिस्थितीत प्रस्तावित दुरूस्ती हे अपिलाचे स्वरूप बदलत नसलेचे तसेच पक्षकारांचे नुकसान होत असल्याचे दिसून येत नाही. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तूतचा अर्ज मंजूर करुन दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ०६ व नियम १७ अन्वये अपिलाचे नाव परिच्छेद मध्ये जाबदार क्र. २ व्यवस्थापनाचे नाव खोडून त्याऐवजी सेक्रेटरी, फोंडाघाट एज्युकेशन सोसायटी, फोंडाघाट ता. कणकवली जि. सिंधुदूर्ग यांचा जाबदार क्र. २ म्हणून समावेश करावा. दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

२. अपिलकार यांनी आदेशापासून १५ दिवसाचे आत अपिलात दुरुस्त करुन दुरुस्त अपिलाची प्रत न्यायपटलावर सादर करावी.

Digitally signed by VAISHALI NIVRUTI DHAVLE
Date: 2025.10.30 12:19:40 +0530

तारीख – २९/१०/२०२५
ठिकाण - कोल्हापूर

(वै. नि. ढवळे)
पीठासीन अधिकारी,
शाळा न्यायाधिकरण, कोल्हापूर